# विद्यापीठात डॉ. कलाम यांना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माजी राष्ट्रपती तथा ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जय बागी, डॉ. अजित कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यापीठ गुणवत्ता हमी कक्ष संचालकपदी डॉ. देशमुख

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष संचालकपदी प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांची नियुक्ती झाली. नॅक मुल्यांकनासाठी करण्यात येणाऱ्या तयारीचे काम या कक्षामार्फत केले जाते. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. के. कामत यांच्याकडे हे पद होते. त्यानंतर डॉ. पी. एस. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांची निवड केली.

# डॉ. महाजन, प्राचार्य शेवाळे, डॉ. गुळवणी अधिष्ठातापदी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या चार विद्याशाखांच्या अधिष्ठातांच्या नियुक्त्यांचा आदेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी नुकताच काढला.

विद्यापीठातील कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांची वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली आहे. डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांची मानव्यशास्त्र शाखेच्या अधिष्ठातापदी, तर विटा येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या प्राचार्य डॉ. मेघा गुळवणी यांची आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली आहे.

# आर. के. कामतसह चौघेजण प्रभारी अधिष्ठाता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध प्रभारी अधिष्ठातापदी डॉ. आर. के. कामत, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे आणि डॉ. मेघा गुळवणी यांची नियुक्ती झाली आहे. त्याबाबतचा आदेश कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी (दि. १६) काढला.

डॉ. कामत यांची विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी यापूर्वी इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख काम केले आहे. डॉ. महाजन यांची वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली आहे. सध्या ते विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत. डॉ. शेवाळे यांची मानव्यशास्त्र शाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली असून, सध्या ते कोल्हापुरातील डी. डी. शिंदे सरकार कॉलेजच्या प्राचार्यपदी कार्यरत आहेत. डॉ. मेघा गुळवणी यांची आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्ती झाली आहे. त्या सध्या विटा येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या प्राचार्यपदी कार्यरत आहेत.

# डॉ. अब्दुल कलाम यांना अभिवादन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** भारताचे माजी राष्ट्रपती तथा ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जय बागी, डॉ. अजित कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये उपस्थित होते.